# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दिनांक : १९/०४/२०२३

## प्रसिध्दी पत्रक (प्रेसनोट)

उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे २०२२ हिवाळी अधिवेशनामध्ये विधेयक क्र. ३५ द्वारे पारीत करण्यात आलेल्या उल्हासनगर शहरातील अनधिकृत बांधकाम नियमाधीन करणे अधिनियम २००६ मधील सुधारणांबाबत पारीत अधिनियमाची माहिती सामान्य जनता, विकासक व वास्तुविशारद यांना व्हावी या अनुषंगाने महानगरपालिकेच्या जी.बी. सभागृहात मा. आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेतली.

सदर बैठकीत शहरातील वास्तुविशारद, परवानाधारक अभियंता व विकासक तसेच पत्रकार उपस्थित होते. प्रथमत: मा. आयुक्त यांनी सदर बैठकीचे प्रयोजन स्पष्ट केले. सुधारित अधिनियम २०२२ मधील तरतुदी स्पष्ट करून त्याबाबत मार्गदर्शन करण्याचा हेतू सदर सभेचा असल्याचे स्पष्ट केले. तसेच, उपरोक्त अधिनियमाच्या अनुषंगाने महानगरपालिका नियमानुकूल करण्यासाठी अर्ज सादर करणे शक्य व्हावे, याकरिता ऑनलाईन पोर्टल तयार करत असून सदर पोर्टल चालु होईपर्यंत नियमानुकूलन करण्यासाठी ऑफलाईन अर्ज स्वीकारले जातील, अशी माहिती मा. आयुक्त यांनी दिली. महानगरपालिकेतील सहाय्यक संचालक श्री. प्रकाश मुळे यांनी सदर अधिनियमातील तरतुदी व अर्ज करण्याची प्रक्रिया व आवश्यक ती कागदपत्रे व नमुने याबाबत संबंधितांस माहिती दिली. सदर अधिनियमातील खालील तरतुदींबाबत माहिती श्री. प्रकाश मुळे यांनी दिली.

१. दि. ०१/०१/२००५ रोजी अस्तित्वात असलेली व विकास योजना रस्ते, उच्चदाब वाहिनी, नाला व जलप्रवाह याद्वारे बाधीत न होणाऱ्या सर्व मिळकती नियमानुकूल होऊ शकतात.

२. उल्हासनगर शहरातील बांधकामे नियमानुकूलन न होण्याचे प्रमुख कारण प्रशमन शुल्क जास्त असणे हे आहे. नवीन अधिनियमात प्रशमन शुल्क हे नियमानुकूल करावयाच्या क्षेत्रावर रु. २२००/- प्रति चौ.मी असे सरसकट आकारण्यात येईल.

३. बांधकाम दृष्ट्या अस्थिर असलेल्या इमारती नियमानुकूल होणार नाहीत, मात्र धोकादायक व मोडकळीस आलेल्या इमारतीमध्ये वापरलेला FSI हा संरक्षित FSI म्हणून वापरण्यात येईल. त्यावर नियमानुसार प्रिमियम FSI अनुज्ञ असेल, अशी तरतुद विकास नियंत्रण नियमावलीत करण्यात येत आहे.

श्री. प्रकाश मुळे यांनी प्रस्तुत अधिनियमात ज्या इमारती नियमीत होणार नसतील त्या इमारती क्लस्टर योजनेत समाविष्ट करून त्यांचा पुर्नविकास करणे शक्य आहे, असे विषद केले. शहराच्या इमारतीचा पुर्नविकास व्हावा यासाठी शासनाने क्लस्टर खालील क्षेत्र ४००० चौ.मी. एवढे करण्यात आलेले असून त्याचा फायदा घेऊन क्लस्टर योजना राबविणेसाठी शहरातील जनतेने पुढे यावे.

झोपडपट्टी पुर्नविकास योजना राबविण्याबाबत मा. आयुक्तांनी पुढाकार घेतला असून मुंबईच्या SRA कार्यालयातील अधिकाऱ्यांशी संपर्क साधुन महानगरपालिका कार्यवाही करत असल्याचे मा. आयुक्तांनी स्पष्ट केले आहे.

(छाया प्रकाश ढोगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत — योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका

सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.